नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

हिंगोली कृषी हवामान सल्ला **मंगळवार, दिनांक – १५.१२.२०२०**

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक १६ ते २० डिसेंबर, २०२०)				
दिनांक	१६/१२	१७/१२	१८/१२	१९/१२	२०/१२
पाऊस	०.०	०.०	०.०	०.०	०.०
कमाल तापमान (अं.से.)	३१.०	३२.०	३२.०	३२.०	३१.०
किमान तापमान (अं.से.)	१७.०	१८.०	१७.०	१६.०	१६.०
ढग स्थिती (आकाश)	स्वच्छ	अंशतःढगाळ	अंशतःढगाळ	ढगाळ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	५६	६५	६२	५६	५२
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	३५	३५	३६	३२	३०
वा-याचा वेग (किमी / तास)	८	६	१०	१०	९
वा-याची दिशा	अगनेय	अगनेय	ईशान्य	ईशान्य	ईशान्य

हवामानाचा इशारा	हवामान अंदाजानूसार पुढील पाच दिवसात आकाश स्वच्छ ते ढगाळ राहून हिंगोली जिल्हयात पुढील २ दिवसानंतर किमान तापमानात २ ते ३ सें. ने घट तर पुढील ३ दिवसानंतर कमाल तापमानात थोडी वाढ होण्याची शक्यता आहे.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
हरभरा	फांद्या लागणे अवस्था	हरभरा पिकात घाटे अळीच्या व्यवस्थापनासाठी शेतात एकरी २ कामगंध सापळे व २० पक्षी थांबे लावावेत. हरभरा पिकात घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी ५ % (एनएसकेई) निंबोळी अर्क किंवा क्विनॉलफॉस २५ % इसी २० मीली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ % ४.५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. हरभरा पिक पेरणी करून ४५ दिवस झाले असल्यास जमिनीच्या प्रकारानुसार पाणी व्यवस्थापन करावे.
करडई	वाढीची अवस्था	करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोट ३० % १३ मीली किंवा असिफेट ७५ % १० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
ऊस	उगवण	ऊस काढणी नंतर ऊस पिकाचे पाचट जाळू नये.
हळद	कंद वाढीची अवस्था	हळद पिकात पानावरील ठिपके या रोगाच्या व्यवस्थापनासाठी ॲझोक्सिस्ट्रोबीन १८.२ % + डायफेनकोनॅझोल ११.४ % एससी १० मीली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. हळद पिकात कंद माशीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ % २० मीली किंवा डायमेथोएट ३० % १० मीली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारणी करावी व मातीने कंद झाकून घ्यावे. (हळद पिकावर

		केंद्रीय कीटकनाशक मंडळातर्फे लेबल क्लेम नसल्यामुळे विद्यापीठ शिफारशीत संशोधनाचे निष्कर्ष दिले आहेत).
संत्रा/मोसंबी	फळ वाढीची अवस्था	संत्रा/मोसंबी बागेत फळ शोषण करणाऱ्या पतंग चा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी बागेत प्रकाश सापळे लावावे. मृग बहार संत्रा/मोसंबी बागेला पाण्याचा ताण बसणार नाही याची काळजी घ्यावी.
डाळिंब	काढणी अवस्था	काढणीस तयार असलेल्या डाळिंबची काढणी करून घ्यावी.
चिकू	वाढीची	चिकू बागेत आवश्यकतेनुसार व्यवस्थापन करावे.
फुल शेती	वाढीची	फुल बागेत पाणी व्यवस्थापन करावे.
भाजीपाला	वाढीची	वांगे भाजीपाला पिकात तुडतुड्याचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी सायपरमेथ्रीन २५ % इसी ३ मीली किंवा बीटा सायफ्लुथ्रिन ८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % ओडी ४ मीली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ढगाळ वातावरण व आर्द्रतेमुळे भाजीपाला पिकात रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी बुरशीनाशकाची फवारणी करावी.
चारा पिके	वाढीची	चारा पीकाला पेरणी करून १ महिना झाला असल्यास ५० किलो प्रती हेक्टर नत्र खताची मात्रा द्यावी.
पशुधन व्यवस्थापन	--	पशुधनाचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी शेळ्या,मेंढ्या तसेच कोंबड्याच्या शेडला बारदाण्याचे पडदे लावावे, त्यामुळे पहाटेच्या थंड वाऱ्यापासून त्यांचे संरक्षण होईल. कोंबड्याच्या शेडमध्ये इलेक्ट्रीक बल्ब लावावे.

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.